# बुचकेवाडी

## एक उलगडत चाललेली यशोगाथा



LUPIN
HWRF


लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन

**गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट विकास समिती**
बुचकेवाडी, तालुका : जुन्नर, जिल्हा : पुणे.
रजि. क्र.: एमएच/१६३७/२०१०/पुणे

**अर्थसहाय्य**

**इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम**

नाबार्ड
**राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक**
**(नाबार्ड), पुणे**



**संकल्पना : श्री. रावसाहेब बढे**
**शब्दांकन : वर्षा काळे**

# प्रस्तावना


लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन (LHWRF) ही स्वयंसेवी संस्था बुचकेवाडी या पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यातील गावात सन २००९ पासून राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांच्या अर्थसहाय्यातून ग्राम विकासाचे कार्य करत आहे. बुचकेवाडी ही मुळतः पारूंडे या गावाची छोटीशी वाडी होती. १९९२ साली ग्रामस्थांनी पारूंडे गावातून वेगळे महसुली गाव निर्माण करत १ जानेवारी १९९२ रोजी बुचकेवाडीची वेगळी ग्रामपंचायत स्थापन झाली. गावाच्या बांधणीस खऱ्या अर्थाने १९९० सालीच सुरूवात झाली, पण ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून गावाच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. मराठा, महादेव कोळी, ठाकूर अशा समाजांना एकत्र आणून, शेती हा केंद्रबिंदू मानून गावाच्या पायाभरणीला सुरूवात झाली. १९९२ ते २०१३ या वीस वर्षांच्या कालावधीत या ग्रामपंचायतीने विकासाचे अनेक टप्पे यशस्वीरित्या पार पाडले. विकासाच्या एका महत्वाच्या टप्प्यावर लुपिन फाउंडेशने बुचकेवाडीला यथोचित सहकार्य केले. आता हे गाव भविष्याकडे भरारी घेण्याबरोबरच अनेक चिमुकल्या, वंचित, दुर्लक्षित, डोंगरी आणि दुर्गम गावांसमोर आदर्श ठेवण्यास सज्ज झाले आहे.

पुणे जिल्ह्यातील पश्चिम घाटात, सह्याद्रीच्या पर्वतरांगात वसलेले हे गाव. गावाच्या तीनही बाजूंना डोंगर आणि वनराई आहे. इथे येणारा रस्ता गावातच संपतो, मात्र इथल्या डोंगरातून उगम पावणारे जलप्रवाह गावाबाहेर वाहून जातात आणि पुढे भिमा नदीला जावून मिळतात. डोंगर उतारावरून पावसाचे पाणी वाहून गेल्यावर इथल्या शेतकऱ्यांना पिक निवडीला जास्त पर्यायच राहत नव्हता. जनावरांसाठी सुका व ओला चाराही पुरेसा नव्हता. उतारावरील जमिनीची पावसाने धूप होत होती. गावात इंधनासाठी सरपण म्हणून वृक्षतोड झाल्याने मृदा वाहून जावून अनेक ठिकाणी जमिनीचा पोत हलका झाला. परिणामी अत्यल्प कृषी उत्पादन व तीव्र पाणीटंचाई अशा दोन्हीचा मारा बुचकेवाडीला वर्षानुवर्ष सहन करावा लागत होता. त्यातच प्राथमिक सुविधाही नाममात्रच होत्या.

अशा अवस्थेतल्या या गावाने स्वच्छ, सुंदर, निर्मळ, पर्यावरण समृद्ध, कृषीप्रधान, तंटामुक्त असा कायापालट करत महाराष्ट्राच्या नकाशावर आपला ठसा उमटावयला घेतला आहे. त्यांच्याकडे समृद्ध वारकरी संप्रदायाचा वसा आहे. संत कोंडाजीबाबा डेरे यांचा वारसा आहे. त्यांच्याकडे नवनिर्माणाची जिद्द आहे, कष्टाची तयारी आहे. सामुदायिकतेची ताकद आणि नवसंकल्पनांची ओढ आहे. मुख्य म्हणजे नेतृत्वाची तयारी असणाऱ्या आदर्शवादी स्त्री पुरुषांची खंबीर फळी गावात उभी होत आहे. त्यामुळेच बुचकेवाडी विकासोन्मुख गाव यशाची नवनवीन स्वप्नं साकारण्यास तयार झाले आहे.

२००९ पासून लुपिन फाउंडेशने या संस्थेने बुचकेवाडीच्या यशाच्या चढत्या आलेखात महत्वाची भुमिका बजावण्यास सुरूवात केली. याची सुरूवात नाबार्ड पुरस्कृत इंडो जर्मन पाणलोट प्रकल्पातून झाली. यशाकडे वाटचाल करणाऱ्या गावास स्वयंसेवी संस्थेची मदत झाल्यास किती मोठे बदल होवू शकतात हे बुचकेवाडीच्या उदाहरणावरून स्पष्ट होवू शकते. या पुस्तिकेचा उपयोग महाराष्ट्रातील विकासोन्मुख गावं, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, अभ्यासक, संशोधक यांना व्हावा ही इच्छा आहे.

# बुचकेवाडी
## गावाचा पूर्वेतिहास



निसर्गाने झोडलं आणि शासनानं तोडलं अशा अवस्थेत असताना बुचकेवाडीला संघटनशक्तीने व जिद्दीने तारलं होतं. १९९० साली गावात लघुपाटबंधारे विभागाने तलावाचे काम पूर्ण केले. तलावात गावातल्या काही शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या. मोबदलाही समाधानकारक मिळाला नाही. डोळ्यासमोर तयार झालेल्या जलाशयाचा शेती सिंचनास उपयोगही करता येइना अशी अवस्था झाली. निराशा आणि फसवले गेल्याची भावना गहिरी होत असताना गावातील तरूण नेतृत्वाने उभारी धरली. झालेल्या अन्यायाविरूद्ध त्यांनी एकिकडे कायदेशीर लढा द्यायचे ठरवले व दुसरीकडे पाणीवापर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरवले. कोणतेही शासकीय अथवा बँकेचे अर्थसहाय्य न घेता ६ सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. स्वखर्चाने, स्वकष्टाने उपसा जलसिंचन योजना पूर्णत्वास नेल्या. ७९ हेक्टर क्षेत्रावर पाणी पोहोचले. भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन अशा सर्वप्रकारच्या उद्योगांना मग शेतकऱ्यांनी जोमाने व उत्साहाने सुरूवात केली. दरम्यान ग्राम पंचायत स्थापन झाली.

गावात विविध कार्यकारी सर्व सेवा (विकास) सोसायटी स्थापन झाली. शेतकऱ्यांना आर्थिक मदत करता येवू लागली. शेतीसाठी कर्जवाटप सुरू झाले. नव्या उमेदीने सर्व गावकरी कामाला लागले. असे असले तरी आर्थिक पाठबळ म्हणावे तसे वाढले नव्हते. गावातील सामुदायिक कामांसाठी निधी उपलब्ध नव्हता. अगदी गावातल्या वारकरी सप्ताहासाठीही पैसे पुरत नव्हते. मग गावाने एकमताने एक नवीन संकल्पना अमंलात आणण्याचे ठरवले. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये तयार पीकं जसे की टोमॅटो, कांदा बटाटा, झेंडू फुले इत्यादी शेतमालाची बाजारात विक्री करण्याआधी गावात त्याची नोंद केली जाते. नोंदवलेल्या प्रति कॅरट किंवा प्रति डाग एक रूपयाप्रमाणे रक्कम जमा केली जाते. वर्ष अखेरीस या जमा निधीचा हिशोब केला जातो. जमा रक्कम गावकऱ्यांमध्ये कर्जरूपाने वितरीत केली जाते. या कर्जावर दहा टक्के व्याज आकारले जाते. हे कर्ज प्रत्येकास एका वर्षाच्या कालावधीकरता दिले जाते. शेती व कौटुंबिक गरजांसाठी सहजसुलभरीत्या मिळणारे कर्ज म्हणून गावकरी याकडे पाहतात. गावाचा पैसा गावातच राहतो. त्याचप्रमाणे गावातील विकास कामांकरता हा निधी ऐन वेळेस वापरता येतो हे गावकऱ्यांच्या लक्षात आले आहे. दहा वर्षांपूर्वी गावाच्या सामुहीक कामांच्या गरजेतून निर्माण झालेली ही अर्थसहाय्याची संकल्पना आजही व्यवस्थितरित्या सुरू आहे. आज २०१३ पर्यंत हा गावकीचा निधी २८ लाख रूपये इतका झालेला आहे. 'फंड' ह्या अनेक गावात अस्तित्वात असलेल्या संकल्पनेला अत्यंत वेगळे, अनोखे असे स्वरूप बुचकेवाडी ग्रामस्थांनी दिले आहे. शेतमालावर कर सदृश्य देणगी, सप्ताहाकरीता दिलेली वर्गणी व कर्जावरील व्याज यातून तयार होणाऱ्या या निधीचा जमाखर्च व वितरण हे सार्वजनिकरीत्या वर्षातून एकाच दिवशी पारदर्शी पद्धतीने करण्यात येते.

गावात भक्ती संप्रदायातील वारकरी शिक्षणाकरता स्थापण्यात आलेल्या गुरूवर्य कोंडाजीबाबा डेरे शिक्षण संस्थेच्या वसतीगृहाला अनेकदा निधीची कमतरता भासत असे. या संस्थेसही गावकीच्या अर्थसहाय्य निधीतून गावाने हातभार लावण्यास सुरूवात झाली.

ग्रामपंचायतीच्या स्थापनेस पंधरा वर्ष झाली तरीही गावापुढे अनेक विकासकामांची आव्हाने होतीच आणि ते त्याला सामोरेही जात होते. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत २००५-०६ या वर्षातील तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाल्याने गावाचा उत्साह वाढला. गाव हागणदारीमुक्त करण्याचा चंग बांधण्यात आला. सहकारी संस्था, युवक मंडळे, यात्रा समिती, महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट, भजनी मंडळं, देवालय समिती या सर्वांची ग्रामपंचायत समितीला साथ होतीच. त्यांचा सर्व उपक्रमांमधला सहभाग हिरीरीचा होता. गांडुळखत प्रकल्प, गोबर गॅस, परसबागा हे लोक सहभागातून करण्यास सुरूवात केली. गावठाणातील रस्ते, गटारे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था, सार्वजनिक शौचालये इत्यादी शासकीय मदतीतून करून घेतले जात होते. या सर्वांची फलश्रुती म्हणून बुचकेवाडीला निर्मल ग्राम पुरस्कारही मिळाला.

## लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन आणि बुचकेवाडीचा विकास

LUPIN HWRF

लुपिन फाउंडेशनही सेवाभावी संस्था गेली दोन दशके ग्रामीण भागात विकास व दारिद्र्य निर्मुलन करण्याचे कार्य करत आहे. सध्या राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तराखंड आणि महाराष्ट्र या चार राज्यातील पंधरा जिल्ह्यांत संस्थेचे कार्य विस्तारले आहे. सन २००० पासून महाराष्ट्रात सिंधुदुर्गपासून सुरूवात करून धुळे व पुणे जिल्ह्यांत संस्थेने ग्रामीण विकासाचे कार्य हाती घेतले आहे. प्रामुख्याने पाणलोट क्षेत्र विकास, रोजगार निर्मिती, कृषी विकास, पशुधन विकास, ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण, आरोग्य, शिक्षण तसेच महिला सबलीकरण अशा विविध क्षेत्रात संस्थेने भरीव कार्य केले आहे.

लुपिन फाउंडेशनने बुचकेवाडीला पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पासाठी खालील निकषांवर निवडले:

१. पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असलेले पाणलोट क्षेत्राचे गाव
२. मागासवर्गीय समाजाची मोठी लोकवस्ती असणारे गाव
३. पडिक व अवनत जमिनीची व्याप्ती आणि तीव्रता जास्त असणारे गाव
४. पाणलोटाचे क्षेत्र १००० ते १५०० हेक्टर पर्यंत असणारे गाव
५. पाणलोट क्षेत्रामध्ये महिलांची पुढे येवून कार्यक्रमात सहभाग दाखवण्याची तयारी
६. भौगोलिक व तांत्रिकदृष्ट्या १ किंवा २ मुख असणारा पाणलोट आणि भुजल पुन:र्भरण होण्यास पूरक पाणलोट
७. मातीची धूप व खालावलेल्या पाणी पातळीमुळे अत्यल्प कृषी उत्पादन असणारे पाणलोट

बुचकेवाडी पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पात लुपिन फाउंडेशन संस्थेने प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा भूमिका बजावली तर नाबार्डने प्रकल्पसहाय्य यंत्रणेचे काम केले. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही देश पातळीवरील वित्त सहाय्य संस्था आहे. भारत सरकार व जर्मनी या द्विपक्षीय करार असलेल्या इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी केंद्र सरकार व के. एफ. डब्ल्यु. या जर्मन बँकेसोबत वित्त व अमंलबजावणी करता नाबार्ड ही यंत्रणा म्हणून कार्यरत आहे.

## गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती

बुचकेवाडी या गावात पाणलोट क्षेत्र विकासाचे काम करण्यासाठी **'गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती'** स्थापन करण्यात आली. गावात होणारी सर्व कामे कायमस्वरूपी टिकण्यासाठी व शाश्वत रहाण्यासाठी ही समिती पुढील काळात कार्यरत राहणार आहे. ही समिती धर्मादाय आयुक्तांकडून नोंदणीकृत करण्यात आली आहे.

**'गायत्री संयुक्त महिला समिती'** ही सुद्धा पाणलोट क्षेत्र विकास समितीप्रमाणेच नोंदणीकृत संस्था आहे. गावातील सर्व बचतगटांची मिळून ही संयुक्त महिला समिती स्थापन करण्यात आली आहे. इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात या संयुक्त महिला समितीचा मोठा सहभाग आहे.

## इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प

बुचकेवाडीच्या प्राथमिक अभ्यासानंतर प्रत्यक्ष पाणलोट क्षेत्र विकासाचे काम सुनियोजित टप्प्यांत पूर्ण करण्यात आले. सुरूवातीला गावात ४ ग्रामसभा घेण्यात आल्या. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील हिवरे बाजार येथे ग्रामस्थांची अभ्यास सहल नेण्यात आली. त्यामुळे गावकऱ्यांना इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाची संपूर्ण कल्पना आली. लोकांना पाणलोटाचे महत्व समजल्याने त्यांनी ग्रामसभेत सर्व नियम व अटींसह प्रकल्प स्विकारण्याचा ठराव मंजूर केला. प्रकल्पासाठी श्रमदानाची तयारी दाखवली व पहिल्या चार दिवसांचे श्रमदान करण्यास त्वरीत सुरूवात केली. प्रकल्पाचा पूर्वक्षमता बांधणी टप्पा ९ महिन्याच्या कालावधीतच पूर्ण करण्यात आला. यामध्ये ६१२११५/– रूपयांचे प्रत्यक्ष काम व १४००६३/– रूपये इतके काम लोकसहभागातून करण्यात आले. विविध मृद संधारण उपचार याबरोबरच मिटिंग, गटचर्चा, ग्रामसभा, प्रशिक्षण शिबीरे, आदर्श व विकसीत गावांना शैक्षणिक भेटी, तांत्रिक प्रात्यक्षिके, व्हिडिओ शोज, पाणलोट क्षेत्र विकास समिती प्रशिक्षण अशा कार्यक्रमांमधून गावात सातत्याने जनजागृतीचे उपक्रम राबवण्यात आले. गावात सामाजिक विकासाच्या दृष्टीने विविध संस्थांची निर्मिती करण्यात आली. युवक मंडळे, शेतकरी मंडळे, महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात आले. महिलांच्या सबलीकरण व आर्थिक उन्नतीकरता विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. महिला स्वयंसहाय्यता गटांची संयुक्त महिला समिती स्थापन करण्यात आली. बुचकेवाडीतील अनेक महिला, शेतकरी, भूमीहीन, अल्पभूधारक, युवक, शेतकरी गट आदींना व्यवसायाकरता कर्ज देण्यात आले. या सर्व कार्यक्रमांबरोबरच कांही नाविन्यपूर्ण असे उपक्रम ही राबवण्यात आले.

## पाणलोट क्षेत्र विकासाचे काम व परिणाम

### माथा ते पायथा उपचार:

ग्रामसभा, 'गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती' व लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून ९१३.०२ हेक्टर क्षेत्रावर ६८,७०,८९९ रुपयांचे पाणलोट क्षेत्र विकासाचे काम फेब्रुवारी २०१३ अखेरीस पूर्ण करण्यात आले. माथा ते पायथा पाणी अडवा पाणी जिरवा हा कार्यक्रम







पूर्णत्वास गेला. वैयक्तिक १५८.६९ हेक्टर पडिक क्षेत्रावर व २४८.६७ हेक्टर जंगल क्षेत्रावर जलसंधारणाचे विविध उपचार करण्यात आले. यामध्ये समतल चर, जलशोषक चर, लूज बोल्डर स्ट्रक्चर, वृक्षारोपण करण्यात आले. लागवडीलायक ४७१.९९क्षेत्रावर बांधबंदिस्ती, दगडी बांध, सिमेंट पाइप आउटलेट इत्यादी कामे करण्यात आली. ओहळ नियंत्रणासाठी दगडी बांध, दोन सिमेंट बंधारे, एक गॅबीयन बंधारा बांधून पूर्ण करण्यात आले. याशिवाय २२ शेततळी, लघु पाटबंधारादुरूस्ती, माती नाला, बांध दुरूस्ती, पाझर तलाव, गाळ काढणे ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात आली.

### जल उपलब्धता व वापर:

वरील सर्व उपचारांमुळे भूजल स्तरामध्ये लक्षणीय वाढ झाली. सुमारे २३.६७ हेक्टर पडिक क्षेत्र कृषीलायक क्षेत्रात परिवर्तीत झाले. तसेच रब्बी हंगामामध्ये १४९.३७ क्षेत्रावर सिंचन सुविधा करण्यात आली. उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर होण्याकरता सुक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. सध्या ७.९० हेक्टरवर ठिबक सिंचन पद्धत अवलंबण्यात आली आहे. या सोबतच भाजीपाला उत्पादनामध्ये कापड आच्छादनाचा प्रायोगिक तत्वावर यशस्वी वापर करण्यात आला आहे.





### उत्पादक संकरीत जनावरांच्या संख्येत वाढ:

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात वृक्ष लागवड केल्याने वृक्षांच्या संख्येत वाढ झाली. वनक्षेत्रात चराइबंदी आणि कुऱ्हाडबंदी करण्यात आली. भाकड व मोकाट जनावरांपासून वनसंरक्षणासाठी राखीव क्षेत्र गायरान म्हणून उपलब्ध करण्यात आले. परिणामी पाणलोट क्षेत्रात लावलेले गवत सुका चारा स्वरूपात उपलब्ध झाले. भाकड जनावरांची संख्या कमी होवून उत्पादक अशा नवीन संकरीत जनावरांची संख्या वाढण्यास सुरूवात झाली. त्याचबरोबर गोठा व्यवस्थापन, चारा व्यवस्थापन, जनावरांची देखभाल व रोगराई विषयक प्रशिक्षण देण्यात आले.

### वनेतर पर्यायी इंधनाचा वापर:

बुचकेवाडीतील ग्रामस्थांमध्ये पर्यायी वनेतर इंधनांच्या वापराबाबत लुपिन फाउंडेशन संस्थेने वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे परिवर्तन घडले. परिणामी गावामध्ये बायोगॅस सौरउर्जेवर चालणाऱ्या कमी इंधनाच्या चुलींचा वापर वाढला. वृक्षतोडीस आळा बसला.

### ठिबक सिंचन:

अतिरिक्त पाण्यामुळे खराब होत असलेल्या जमिनीचे नुकसान टाळण्यासाठी पाण्याचा काटेकोर व नियोजनात्मक वापर करायला हवा हे पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पामुळे गावकऱ्यांच्या लक्षात आले. कमी खर्चात जास्तीतजास्त पीक उत्पादन व पाणी बचतीसाठी ठिबक सिंचन आवश्यक आहे याबाबत ते जागरूक झाले. ग्रामपंचायत, पाणलोट विकास समिती, नाबार्ड व लुपिन फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच अर्थसहाय्यातून ठिबक सिंचनाचा वापर शेतकऱ्यांनी कांदा, बटाटा, टोमॅटो, काकडी, फुलशेती व फळबागांसाठी सुरू केला.



## रोपवाटीका, गांडुळखत व परसबाग:

इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पातून वृक्षारोपण करण्याकरता वैयक्तिक शेतकरी व महिला बचत गटांना रोपवाटीका तयार करण्याचे काम देण्यात आले. जैविक खतांचे शेतीमधील प्रमाण वाढवण्यासाठी गांडुळखत प्रकल्प उभारण्यात आला. तसेच १५० कुटुंबांना 'क' जीवनसत्व, लोह आणि कॅल्शीयमची कमतरता घालवण्याकरता परसबागेत भाजीपाल्यासोबतच शेवगा लिंबू अशी फळझाडेही देण्यात आली.











## सामुहीक शेती अवजार बँक:

या उपक्रमाद्वारे गावातील गरीब शेतकऱ्यांना आधुनिक अवजारांची ओळख करून देण्यात आली. यामुळे शेती सुलभ व फायद्याची होवू शकते हे त्यांच्या लक्षात आले. आता अल्पशा भाड्याने कुळव, काळपे, नांगर, चैतन्य सारा यंत्र, बटाटा लागवड मशीन, भात मळणी यंत्र, मल्चींग पेपर मशीन, ठिबक गुंडाळणी यंत्र, एस टी पी फवारणी यंत्र, पॉवर स्प्रे, वाहतूक हातगाडी ही अवजारे गरजू शेतकऱ्यांना सामुहीक शेती अवजार बँकेतून देण्यात येतात.





## सुधारीत, समृद्ध आणि वैविध्यपूर्ण शेती:

भातशेतीमध्ये सुधारीत भात बियाणांचा (इंद्रायणी, फुले समृद्धी, कर्जत ३) वापर शेतकरी करू लागले आहेत. त्याचबरोबर प्रकल्पामुळे बुचकेवाडीत पीक विविधता दिसून येत आहे. परंतु पारंपारीक भातशेतीच्या ऐवजी बटाटा, टोमॅटो अशा भाजीपाल्याचे उत्पादन शेतकरी घेवू लागले आहेत. खरीपात २१० तर रब्बीत ४२.४० हेक्टरवर भाजीपाला लागवड करण्यात येत आहे. वाढलेल्या पाण्याचा योग्य वापर करत आलं आणि हळद या सारख्या किफायतशीर पिकांची लागवडही शेतकरी आता करू लागले आहेत.

सुमारे १३.५ हेक्टरवर ५५ शेतकऱ्यांनी केशर जातीच्या आंब्यांचीही लागवड केली आहे. तसेच २३.६७ हेक्टरवर कोरडवाहू फळबाग तयार करण्यात आली. कोरडवाहू फळबागेत सीताफळ व आवळा यांची लागवड करण्यात आली. कांही शेतकऱ्यांनी फळबागांकरता ठिबक सिंचनाचा वापर केला आहे.

याबरोबरच साधारण ३८ हेक्टरवर झेंडु, शेवंती यासारख्या फुलांची शेती केली जात आहे. खरीपात पूर्ण ३८ तर रब्बीमध्येही ८ हेक्टर क्षेत्रात फुलशेती केली जाते.





## कांदा व बटाटा चाळ:

गावात शेतकरी दरवर्षी कांदा व बटाटा कांही प्रमाणात घेत असत. परंतु खरीपात बटाटा व रब्बीत कांदा उत्पादन एकदम निघत असल्याने बाजारभाव खाली येतात. साठवणुकीची यंत्रणा नसल्याने शेतकऱ्यांना कांदा व बटाटा येइल त्या किंमतीस विकण्याशिवाय पर्याय राहत नसे. हे लक्षात घेवून लुपिन फाउंडेशन व नाबार्ड मार्फत अर्थसहाय्य पुरवण्यात आले. तब्बल २५ ते ५० टन क्षमतेच्या कांदा व बटाटा चाळी बांधण्यात आल्या. त्यातून जवळ जवळ १००० मे. टन कांदा व बटाटा साठवणुकीची सोय झाली.





## एकात्मिक किड व्यवस्थापन:

वातावरणातील बदलांमुळे शेतीवरील उत्पादनखर्च वाढत चालला आहे. हा खर्च कमी करण्याकरता शेतकऱ्यांच्या सहकार्यातून एकात्मिक किड व्यवस्थापन कार्यक्रम तयार करण्यात आला. यामध्ये कामगंध सापळे, निळे व पिवळे स्टीकी कार्ड, पक्षी थांबे व इतर जैविक, रासायनिक क्रियांचा सहभाग आहे.

## गटशेती:

मुंबई व पुणे यासारखी व्यापारी शहरे जवळ असल्याने शेतकऱ्यांना भाजीपाला उत्पादनास प्रवृत्त करून सामुहीक शेती करण्यास प्रारंभ करण्यात आला.शेतकरी गट स्थापन करून टोमॅटो, बटाटा या पिकांसाठी पेप्सी, बालाजी या कंपन्यांशी कराराची शेती करून मार्केटींग करण्यात आले. बियाणे, खते, औषधे सामुहीकरित्या खरेदी केल्याने आर्थिक लाभ होवून निर्यात वाढ झाली. बुचकेवाडीतील गटशेतीचा व्यवसाय हा अनेक अर्थांनी यशस्वी व मार्गदर्शक ठरणारा आहे. यामुळे पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पातील गावात व ग्रामस्थांमध्ये सहभागाचे व उत्साहाचे प्रमाण वाढण्यास खूप मदत होवू शकते.





## ग्राहकांना थेट भाजीपाला विक्री:

कृषी व पणन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सुरू केलेल्या थेट भाजीपाला विक्री या उपक्रमात गावातील शेतकरी मंडळ, शेतकरी कृषी बचत गट व इतर शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. पुणे येथील विविध गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या संपर्काने थेट भाजीपाला विक्री सुरू केली. यातून शेतकऱ्यांना उत्पन्नाचे नवीन साधन निर्माण झाले.





## संगणकीकृत पाणी मोजमाप यंत्र:

कोणत्या पिकांस किती पाणी द्यायचे याकरता अवगत तंत्रज्ञान डेटामॅट्रीक रिमोट मीटरींग युनिट (DRMU) वापरले जाते. बुचकेवाडीत या उपकरणाच्या सहाय्याने कोणत्या शेतकऱ्यांने प्रतिदिन, प्रतितास किती पाणी व वीज वापरले याचा अहवाल तयार करण्यात येतो. याद्वारे पाण्याचे योग्य नियोजन करता येते. तसेच पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक नियोजनही करता येते. अशा प्रकारचे तंत्रज्ञान वापरणारे बुचकेवाडी हे भारतातील पहिले गाव ठरले आहे.





## महिला विकास:





बुचकेवाडीत महिलांच्या सक्षमीकरणाचे जे प्रयत्न झाले त्याचा सकारात्मक परिणाम आज गावात पहायला मिळतो. गावातील महिलांचे एकूण १२ स्वयंसहाय्यता गट व या सर्व गटांची मिळून 'गायत्री संयुक्त महिला समिती' हा गावपातळीवरील संघ (Federation) कार्यरत आहे. या महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करताना जागृती बैठका घेण्यात आल्या. त्यांना हिशोब ठेवण्याचे तसेच कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण देण्यात आले. या गटांना बँकांशी संलग्न करून अर्थसहाय्य मिळवून देण्यात मदत करण्यात आली. महिला मेळाव्यामधून नेतृत्वगुण असणाऱ्या, विशेष कामगिरी करणाऱ्या, दोन मुली झाल्यानंतर ऑपरेशन करून घेणाऱ्या स्त्रियांचा सत्कार करण्यात आला.

स्वयंसहाय्यता गटांतील सभासदांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये टोमॅटो सॉस, राखी, गारमेंट, बारदान, मेणबत्ती बनवणे याचे प्रशिक्षण देण्यात आले. अत्याधुनिक गारमेंट युनिट सुरू करण्याआधी ९ महिलांना १५ दिवसांचे नारायणगाव येथे हाय स्पीड शिलाई मशीनचे प्रशिक्षण देण्यात आले. या युनिटमुळे स्त्रियांना रोजगाराचे नवीन साधन उपलब्ध झाले आहे. त्याचप्रमाणे बारदान युनिट करता अहमदनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये (MIDC) महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. दख्खन यात्रा व भीमथडी यात्रेत बचत गटातल्या महिलांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. तेथे त्यांनी विविध वस्तूंची विक्री केली. मांसवडी व जेवणाचे स्टॉल लावले. महिलांच्या आर्थिक विकासाचे प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यक्रमांना बुचकेवाडी गावात आता चांगला प्रतिसाद लाभत आहे. महिलाही विविध सामाजिक, सांस्कृतिक व ग्रामविकासाच्या कामात मोठे योगदान देत आहेत.

## स्वयंरोजगाराच्या नवीन संधी:







पाणलोट क्षेत्र विकासाचे उद्दीष्टं त्या भागातील नैसर्गिक संसाधनांची वृद्धी हे असते. परिसरातील लोकांच्या उपजिविकेच्या साधनांवर पाणलोट क्षेत्र विकासाचे दूरगामी परिणाम होत राहतात. मात्र नजिकच्या काळात या नैसर्गिक संसाधनांच्या वृद्धी सोबतच उपजिविकेच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्या लागतात. याकरता त्यांना मार्गदर्शन व अर्थसहाय्याची गरज असते. हे लक्षात घेवून बुचकेवाडीत लुपिन फाउंडेशनने विविध व्यवसायासाठी वेगवेगळ्या योजनांमधून कर्ज उपलब्ध करून दिले यामध्ये उत्पादक संकरीत गायी, परसदारातील कुक्कुटपालन, नव्या विहीरी खणणे, जुन्या विहीरींची दुरूस्ती, पाइपलाइन, ठिबक सिंचन, कांदा बटाटा चाळी, गटशेती, सुतारकाम, चर्मोद्योग, शिलाईकाम, पीठ गिरणी, मोटार वाईंडिंग, वाहनदुरूस्ती गॅरेज, बांगड्यांचे दुकान, डाळ मिल, इलेक्ट्रीकस्प्रे पंप अशा व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले.

## रोजगारासाठी कौशल्यवृद्धी

बुचकेवाडीतील युवक युवतींना पॅरा मेडीकल प्रशिक्षणाकरता नोंदणीकृत संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. याचा ९ युवक युवती लाभ घेत आहेत. तसेच विद्यार्थ्यांकरता MS-CIT व Tally यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. याशिवाय वाहन चालवण्याचे प्रशिक्षणही गावपातळीवर आयोजित करण्यात येते.





## आरोग्य शिबीरे

नेत्रचिकित्सक, बालरोग तज्ञ, हाडांचे तज्ञ, दंतरोग तंज्ञ, स्त्रीरोग विशेषज्ञ यांच्या सहकार्याने बुचकेवाडीत अनेक आरोग्य शिबीरे घेतली जातात. बुचकेवाडीत महिला व पुरूषांचे हिमोग्लोबीन व हाडांची डेन्सिटी चाचणी घेण्यात आली आहे व कमतरतेनुसार त्यांना उपचारही देण्यात आले आहेत. रूबेला लसीकरण शिबीर नेमाने घेण्यात येते.





## पुढील दिशा

गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती, लुपिन फाऊंडेशन व बुचकेवाडीतील गावकरी यांनी गाव विकासाची पुढील दिशा निश्चित केली आहे. यात जलव्यवस्थापन, भाजीपाला उत्पादन, फळशेती व फुलशेती वाढविण्यास प्राधान्य दिले आहे. शेती उत्पादन मालासाठी पुरेसा भाव मिळविण्याकरिता योग्य बाजारपेठ जोडण्यावरसुद्धा भर देण्यात येईल. याशिवाय पारंपारिक ऊर्जा स्त्रोत विकासाकरिता विशेष लक्ष देण्याचे ठरविले आहे. निरंतर व प्रभावी विकासाच्या माध्यमातून नवनवीन यशाचे टप्पे गाठण्यास बुचकेवाडी सज्ज झाली आहे.

**बुचकेवाडी गावास डोंगरी भागातून जिल्हा परिषद पुणे द्वारा सन २०१२-१३ करिता जिल्ह्यातून प्रथम आदर्श कृषीग्राम पुरस्कार प्रदान करण्यात आला.**



‘ सहभाग, विचार, मेहनत आणि नियोजन यांतूनच विकास साधता येतो. पाणी म्हणजेच प्रगती. थेंबाथेंबाने पाणी साठवणे जितके गरजेचे आहे तितकेच थेंबाथेंबाने वापरणे देखिल आवश्यक आहे. बुचकेवाडीत १०० टक्के ठिबक सिंचनावर शेती करण्याचे उद्दीष्ट पूर्ण करायचे आहे. शेती अत्याधुनिक व्हावी. सर्व पिकं घेता यावीत याबरोबरच दर्जेदार शेतमालाच्या उत्पादनाकडेही लक्ष द्यायला हवे.’

**-सौ. आशाताई बुचके, जिल्हा परिषद सदस्य, पुणे**

‘ जिद्द, कष्ट, पाणी आणि महिला सक्षमीकरण यांतून बुचकेवाडीचा उत्कर्ष होवू शकतो हे लुपिन फाउंडेशनच्या माध्यमातून लक्षात आले आहे. सर्व शासकीय योजना गावात आणणार व यशस्वी करून दाखवणार आहे. गावातील प्रत्येक आदिवासी कुटुंबाचा विकास ही आता प्राथमिकता आहे.’

**-सौ. वर्षा डेरे, सरपंच, बुचकेवाडी**

‘लुपिन फाउंडेशन व नाबार्ड यांच्या माध्यमातून गावात पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प यशस्वी करण्याचा अनुभव घेतल्यावर आता या प्रकल्पाची भविष्यातील दुरूस्ती व देखभाल करण्याकरता गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती कटीबद्ध आहे. तयार झालेल्या नैसर्गिक संसाधनांमध्ये वृद्धी होत राहील याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

**- श्री. शिवाजी डेरे, अध्यक्ष, ‘गुरूवर्य कोंडाजी बाबा डेरे पाणलोट क्षेत्र विकास समिती’, बुचकेवाडी**

‘दरडोई उत्पन्न वाढणे म्हणजे गावाचा विकास. बारमाही पाणी आणि बारमाही शेतीच गावात समृद्धी आणू शकते असे असले तरी आदर्शवादी विचार गावात सुख आणू शकतात. लुपिन फाउंडेशन या माध्यमातून आदिवासी, गरीब, महिला यांचे सक्षमीकरण व कृषीकेंद्री ग्रामविकास या विचारांचा ठसा बुचकेवाडीतील प्रत्येकाच्या मनात उमटला आहे.’

**-श्री. सुरेश गायकवाड, माजी सरपंच, बुचकेवाडी**

पुरस्कार मिळत होते परंतु गावाचा, गावकऱ्यांचा सर्वसमावेशक, सर्वांगीण विकास होत नव्हता. अजून मोठ्या प्रमाणात शेती कोरडवाहू होती. सिंचनाचा प्रश्न सुटला नव्हता. मजुरीसाठी वणवण थांबली नव्हती. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मिटला नव्हता. डोंगरावरून वाहून जाणारे पाणी थांबवता येत नव्हते. खुप मोठ्या क्षेत्रावर पाणलोट विकासाचे काम करावे लागेल हे कळत असुनही त्यावर उपाययोजना करता येत नव्हती. अशाच काळात लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशनने बुचकेवाडीची ग्रामविकासाकरता निवड केली आणि नव्या बदलाच्या दिशेने गावाची वाटचाल सुरू झाली.

